जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ अंतर्गत मृद व जलसंधारण कामांना तांत्रिक मंजुरी देणे व प्रकल्प अनुदान मंजूर करणे या बाबींसाठी प्रकल्प संचालक व कृषि विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत सुधारणा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
**शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम-१९०४६/४/२०२५-MAG-८A(E-९४५२०३)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०२६

**संदर्भ :**

१. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक : नादेकृ-४६२२/प्र.क्र.९४/८अे, दिनांक ३०.०६.२०२३.
२. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक : नादेकृ-४६२२/प्र.क्र.९४/८अे, दिनांक ०८.०७.२०२५.
३. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक : कृवपदुम-१९०४६/४/२०२५-MAG-८A(९४५२०३), दिनांक १२.०९.२०२५.
४. शासन निर्णय, मृद व जलसंधारण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.३४४/जल-७, दिनांक ०१.१०.२०२५.
५. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांचे पत्र क्र.NDKSP-१३०८०(३०)/५/२०२५-१३, दिनांक २०.११.२०२५

**प्रस्तावना :**

कृषि व पदुम विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दिनांक ३०.०६.२०२३ व संदर्भ क्र.२ येथील दिनांक ०८.०७.२०२५ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या मान्यतेनुसार राज्यातील २१ जिल्ह्यांमधील ७२०१ गावांमध्ये जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत मृद व जलसंधारणाच्या विविध उपचारांची कामे कृषि विभागाच्या प्रचलित कार्यपद्धतीनुसार कृषि विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेमार्फत करण्यात येतात.

२. कृषि व पदुम विभागाच्या संदर्भ क्र.३ येथील दिनांक १२.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ (भाग-दुसरा) नुसार प्रकल्प संचालक व कृषि विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मधील अनुक्रमांक २७ (ब) अन्वये मृद व जलसंधारण कामांना

तांत्रिक मंजुरी देणे आणि अनुक्रमांक २८ अन्वये प्रकल्प अनुदान मंजूर करणे या बाबींसाठी वित्तीय मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत.

३. दरम्यान, मृद व जलसंधारण विभागाच्या संदर्भ क्र.४ येथील दिनांक ०१.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांना मृद व जलसंधारण उपचारांच्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी देण्याबाबतच्या वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत सुधारणा करण्यात आली आहे. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ अंतर्गत सदर कामांची अंमलबजावणी कृषि विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फतच करण्यात येत असल्याने, प्रकल्पांतर्गत लागू असलेल्या वित्तीय मर्यादा व कृषि विभागाच्या नियमित योजनांतील वित्तीय मर्यादा यांमध्ये सुसंगती राखणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने, प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प यांच्या दिनांक २०.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, कृषि व पदुम विभागाच्या दिनांक १२.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ अंतर्गत मृद व जलसंधारण कामांना तांत्रिक मंजुरी देणे (Technical Sanction to NRM Works) व प्रकल्प अनुदान मंजूर करणे (Approval of Payment Subsidies) या बाबींसाठी कृषि व पदुम विभागाच्या संदर्भ क्र.३ येथील दिनांक १२.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मधील अनुक्रमांक २७ (ब) - मृद व जलसंधारण कामांना तांत्रिक मंजुरी देणे आणि अनुक्रमांक २८ - प्रकल्प अनुदान मंजूर करणे या दोन बाबींकरीता कृषि विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे सुधारीत वित्तीय अधिकार मर्यादा प्रदान करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर शासन निर्णयान्वये देण्यात आलेली सुधारित वित्तीय मर्यादा ह्या कृषि विभागाच्या यापूर्वीच्या दिनांक १२.०९.२०२५ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मधील अनुक्रमांक २७ (ब) - मृद व जलसंधारण कामांना तांत्रिक मंजुरी देणे आणि अनुक्रमांक २८ - प्रकल्प अनुदान मंजूर करणे या दोन बाबींकरीताच लागू राहतील.

३. सदर सुधारित वित्तीय मर्यादांचा वापर वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ (भाग-दुसरा), प्रकल्पाच्या वित्तीय व्यवस्थापन पुस्तिकेतील तरतुदी, प्रकल्पाच्या अंमलबजावणी पुस्तिकेतील तरतुदी आणि शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे संबंधित आदेश व मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून करण्यात यावा.

४. परिशिष्ट-अ मधील स्तंभ-४ मध्ये विहित केलेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त खर्च अपेक्षित असल्यास अथवा विहित अटींपैकी एखादी अट पूर्ण होत नसेल तर अशा प्रस्तावास वित्त विभागाची वित्तीय मंजूरी आवश्यक राहील.

५. सदर शासन निर्णयान्वये कृषि विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येणारे वित्तीय अधिकार केवळ नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ करिताच असतील.

६. हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून संबंधित अधिकाऱ्यांना सदर वित्तीय अधिकार प्राप्त होतील व नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ औपचारीकपणे बंद झाल्यानंतर सदर वित्तीय अधिकार आपोआप संपुष्टात येतील.

७. या शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार अर्थसंकल्पीय अनुदानाच्या उपलब्धतेच्या अधिन राहून देण्यात येत आहेत.

८. या शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या सुधारणांव्यतिरिक्त कृषि व पदुम विभागाच्या दिनांक १२.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील इतर तरतुदी व अटी यथावत लागू राहतील.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२५/२०२६/व्यय-१, दिनांक ०४.०२.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून, त्याचा संगणक संकेतांक २०२६१०२६१६२२२२३९४६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf dept, 2.5.4.20=3021BF955FEFD71FFAD5DD7C97769147F19ACA6383A12FED6CFF4849D78E224A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B5B30AEBA818C77E43E7B8BA4BCA0E9F0D137FEAB0BBCB16CACF2D44087E8A76, cn=GANPAT SANDIPAN KACHARE
Date: 2026.10.26 16:23:10 +05'30'

**(ग.सं.कचरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास विभाग), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (अल्पसंख्यांक, क्रिडा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा.मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद विधानभवन, मुंबई
६. सर्व मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७. सर्व संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य/महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
११.अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई
१४.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे

१५.संचालक, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई
१६.संचालक (लेखा व कोषागारे), संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७.सर्व उप सचिव / सह सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. विभागीय आयुक्त (नाशिक / अमरावती/नागपूर/छत्रपती संभाजीनगर)
१९.सर्व जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०.कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा- अहिल्यानगर
२१.कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
२२.कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
२३.विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
२४.सहसंचालक (लेखा व कोषागारे), कोकण विभाग, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.
२५.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला
२६.जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (सर्व)
२७.प्रकल्प संचालक (आत्मा), सर्व
२८. उपविभागीय कृषि अधिकारी (सर्व)
२९.तालुका कृषि अधिकारी (सर्व)
३०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरिक्षा / लेखा अनुज्ञेयता)
३१.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
३३.वित्त विभाग (व्यय-१/सेवा-९/आपुक/विनिमय), मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
३४.नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०००३२,
३५.निवड नस्ती (कार्यासन-८अे)

## परिशिष्ट-अ

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी
## वित्तीय अधिकार नियमपुस्तिका-१९७८, भाग-दुसरा, नुसार
## कृषि विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वित्तीय अधिकारांचे प्रदान

| अ. क्र. | शासन निर्णय, दि.१२.०९.२०२५ सोबतच्या परिशिष्ट-अ मधील अनु.क्र. | वित्तीय शक्तीचे वर्णन | वित्तीय अधिकार पुस्तिकेनुसार अधिकाराचा वापर करण्यास सक्षम प्राधिकारी | रकाना-३ येथील सक्षम प्राधिकाऱ्याचे वित्तीय अधिकार वापरण्यासाठी शक्ती प्रदान करण्यात येणारे अधिकारी व त्यांना मंजूर करण्यात येत असलेली वित्तीय मर्यादा | अटी व शर्ती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | २७ | (ब) मृद व जलसंधारण कामांना तांत्रिक मंजुरी देणे (Tchnical Sanction to NRM works) | नवीन शक्ती | क) मृद व जलसंधारण घटकासाठी तांत्रिक मान्यता देणे-<br>१) विभागीय कृषि सहसंचालक - रु.१००.०० लक्ष पर्यंत प्रति काम<br>२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी- रु.७५.०० लक्ष पर्यंत प्रति काम<br>३) उपविभागीय कृषि अधिकारी - रु.५०.०० लक्ष पर्यंत प्रति काम | १. मृद व जलसंधारण अंतर्गत प्रस्तावित केलेले काम गावाच्या अनुकूलन आराखड्यामध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे.<br>२. प्रस्तावित केलेले काम प्रकल्पाच्या अंमलबजावणी पुस्तिकेतील व वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सूचनेमधील तांत्रिक निकषाप्रमाणे पूर्ण केलेले आहे, असे कृषि विभागाच्या क्षेत्रिय यंत्रणेने प्रमाणित करणे आवश्यक राहील.<br>३. संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांच्याकडून निर्गमित मार्गदर्शक सूचनाद्वारे वेळोवेळी होणारे बदल प्रकल्पातील संबंधित घटकास लागू राहतील. |
| २. | २८ | प्रकल्प अनुदान मंजूर करणे (Approval of Payment of subsidies) | नवीन शक्ती | क) मृद व जलसंधारण घटकासाठी -<br>१) विभागीय कृषि सहसंचालक - रु.१००.०० लक्ष पर्यंत प्रति काम<br>२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी- रु.७५.०० लक्ष पर्यंत प्रति काम<br>३) उपविभागीय कृषि अधिकारी - रु.५०.०० लक्ष पर्यंत प्रति काम | १. आवश्यक निधी उपलब्ध असला पाहिजे.<br>२. सदर कामास पूर्व संमती दिलेली असली पाहिजे.<br>३. प्रस्तावित केलेले काम प्रकल्पाच्या अंमलबजावणी पुस्तिकेतील व वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सूचनेमधील तांत्रिक निकषाप्रमाणे पूर्ण केलेले आहे, असे कृषि विभागाच्या क्षेत्रिय यंत्रणेने प्रमाणित करणे आवश्यक राहिल.<br>४. सदरच्या अनुदानाचे वितरणे लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात (DBT) करणे आवश्यक राहील. |